


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# 'वाडा' कादंबरीचा सांस्कृतिक अभ्यास

**कु. पल्लवी तु. मावंदे**
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

**प्रस्तावना**

स्वात्रंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी व पुढे आदिवासी साहित्य हे प्रमुख वाङ्मयप्रवाह निर्माण झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकतृत्वामुळे व लोकशाही शासनप्रणालीमुळे सर्व समाजाच्या तळागळातील लोकांना शिक्षण मिळू लागले. त्यामुळे जनप्रवाह वर्तमान प्रवाहात सामील होऊ लागला. शिक्षणामुळे प्रगल्भ झालेला उपेक्षित जनसमूह आपले दु:ख साहित्यातून मांडत होता. त्याच काळात जंगलात स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या आदिवासींपर्यंत संथगतीने का होईना शिक्षण पोहचल्यामुळे आदिवासींमध्ये शिक्षित तरूणांची एक पिढी निर्माण झाली. त्यांनी आपले जीवनानुभव अभिव्यक्त करण्यासाठी साहित्याचा आधार घेतला. आपली संस्कृती, परंपरा, व्यथा-वेदना, दारद्रि, भटकंती, जंगलाशी एकनिष्ठता, संघर्ष इत्यादींचे जीवनानुभव साहित्यातून मांडण्यास सुरूवात केली.

श्री. व्यं. केतकर यांच्या गोंडवणातील 'प्रियंवदा' या कादंबरीपासून अनेक बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासी जीवनाचे चित्रण करणाऱ्या जवळपास ३०-३२ कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. या कालखंडात आदिवासी लेखक कादंबरी या वाङ्मयप्रवाहात अगदी नव्याने पदार्पण करीत होते. आदिवासी लेखक कादंबरी या वाङ्मयप्रवाहात अगदी नव्याने पदार्पण करीत होते. आदिवासी लेखक हा अनुभवसंपन्न अशा वातावरणात लहानपणापासून वाढल्यामुळे त्याच्या साहित्यामध्ये आदिवासींचे उपेक्षित व वंचितांचे जगणे आलेले आहे. तसेच दलाल, सावकारांकडून होणारी फसवणूक, अरण्यांनी वेढलेला प्रदेश असे व अन्य स्वरूपाच्या विविधांगी अनुभवांचे चित्रण येते. प्रा. माधव सरकुंडे यांची 'वाडा', नजूबाई गावित यांची 'तृष्णा', भीवा फरारी, बाबाराव मडावी यांची 'टाहो' गोपाळ गवारी यांची

'कोळवाडा', डॉ. दीपककुमार वळवी यांची 'डुबु डुबुग...च्याय च्याय', बाबुराव नाईक यांची 'शिबली', निवृत्ती घोंगडे व शांताराम गजे यांची 'बागडीची माची', व देवदत्त चौधरी यांची 'पळसचोंड' या कादंबऱ्यांचा आपणास प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

**'वाडा' कादंबरीचे स्वरूप**

प्रा. माधव सरकुंडे यांची 'वाडा' ही पहिलीच कादंबरी आंध (आदिवासी) जमातीच्या जीवनातील समग्र शोषणाची, गुलामगीरीचे उत्कट चित्रण करते. मराठी साहित्यात आदिवासींच्या जीवनावर काही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. अलिकडे डॉ. मधुकर वाकोडे (झेलझपाट), सुरेश द्वादशीवार (हाकुमी) पण त्या आदिम जीवनाला पुरेशा प्रमाणात न्याय देऊ शकल्या नाही. परंतु आज आदिवासी लेखक जाणीवपूर्वक ताकदीने बोलू, लिहू लागला आहे. वाडा ही कादंबरी त्याचेच पुढचे पाऊल आहे.

आंध जमातीतील माणसाच्या मनाचे विविध पैलु आणि त्याची झालेली कोंडी सोडविण्याची लेखकाची तळमळ लक्षणीय आहे. एकीकडे दु:ख, शोषण, दारिद्र्याचा भोगवटा यामुळे संताप, चीड, संघर्ष आहे. पण तेव्हाच मनाचा उदात्तपणा, संयम, जीवंतपणा आहे. जीवनाकडे तटस्थपणे बघून दु:ख निवारण्याची संयम वाटचाल करून माणसाला माणसासारखे जगता कधी येईल ही तीव्र जाणीव कादंबरीत प्रखरपणे दिसून येते. सामाजिक अन्यायाने पेटून उठणारा आंधचा काजवा याच्या हा या कादंबरीचा नायक आहे. गावच्या पाटलांने केलेल्या सतत अन्याय-अत्याचाराला समर्थपणे तोंड देतो. ती लाचारी पत्करत नाही स्वाभिमानाचा बळी देत नाही. आंधवाडीतील लोक बाज्याला समजून घेत नाही. ते पाटलांच्या वर्चस्वाखाली गुलाम होऊन जगण्यातच धन्यता मानतात. परंतु बाज्याच्या संघर्ष अविरत सुरूच असतो.

या कादंबरीतून आंध आदिवासी जमातीचे वेगवेगळ्या मार्गाने होणारे शोषण उजागर केलेले आहे. आंधातील दारिद्र्य, संघर्ष, व्यक्तीच्या वृत्तीप्रवृत्ती, श्रद्धा व अंधश्रद्धा, भेदभावी वृत्ती, परंपरावादी दास्यत्व, हातावरचे पोट, जादुटोणा, भुतखेत इत्यादी अनेक बाबी लेखक पोटतिडकीने या कादंबरीतून मांडतो. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील शेठ, सावकार, पाटील आंध समाजाला कसे ओरबडतात याचा

दस्तऐवज म्हणजे वाडा ही कादंबरी होय. ग्यानवा पाटलाच्या श्रीमंतीची, अत्याचाराची, शोषणाची गुलामी परंपरांची वास्तू म्हणजे वाडा. त्याप्रमाणे आंधवाडीतील आंधाचे जीवन उद्धवस्त करू पाहणाऱ्या व्यवस्थेचे प्रतीक म्हणजे वाडा. अशी अनेक प्रतीके वाचकासमोर उभे राहतात.

प्रस्तुत शोधनिबंधातून प्रा. माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' या कादंबरीतून अभिव्यक्त झालेल्या सांस्कृतिक अभ्यास जसे ग्रामीण संस्कृती, सण-उत्सव, कृषी, क्रीडा संस्कृती या विविधांगी सांस्कृतीचा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**'वाडा' कादंबरीचा संस्कृतिक अभ्यास**

"आदिवासी साहित्य ही प्राचीन संस्कृतीचे लेणे आहे. ती जशी सांस्कृतिक आहे तशीच ती एक सामाजिक, साहित्यिक अगातून वाटचाल करते. आदिवासी साहित्याचा आधार सांस्कृतिक जाणिवेतच शोधला पाहिजे. आदिवासी साहित्याची प्रेरणा त्याच्या सांस्कृतिक अधिष्ठानातच आहे." या प्रा.डॉ. विनायक तुमराम यांच्यापुढे जाऊन माधव सरकुंडे फुले-आंबेडकरी विचारसरणीतून वाड्याकडे बघतात. अंध जमातीच्या जीवनाचे स्वकथन करणारी 'वाडा' ही ऐतिहासिक व क्रांतीकारी स्वरूपाची कादंबरी म्हणून केलेली वाटचाल प्रशंसनीय अशी आहे.

भारतातील अनेक प्रांतात आणि महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यात आंध जमातीचे लोक आढळून येतात. नांदेड, परभणी, बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ येथे आंध जमात आहे. यवतमाळ जिल्ह्यात दिग्रस तालुक्यामध्ये आंधाची एकूण लोकसंख्या चाळीस हजार एवढी आहे. आंधाच्या वस्तीला वेटाळ म्हणतात. महाराष्ट्रातील आंध जमात मराठी समाज जीवनाशी एवढी समरस झालेली आहे की, त्यांना वेगवेगळे असे कुणी समजू शकत नाही. प्रा. सरकुंडे यांनी कादंबरीतून आंध जमातीच्या विविध अंगाचे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने केले आहे. मराठी कादंबरीचे दालन समृद्ध करण्याचे हे सांकेतिक सुचक चिन्ह आहे.

आदिवासी या देशातील मूळ निवासी असून तो आजही उपराच जगतो आहे. आदिवासी संस्कृती अनेक रीती-रिवाजावरून आजच्या आधुनिक समाजव्यवस्थेत सुद्धा एक समाज घटक दुसऱ्या

समाजघटकापासून वेगळा ओळखू शकतो. भाषा, पोशाख, लग्नविधी, पुजा-अर्चा, लोकनृत्य इत्यादीचे वैशिष्ट्य हे संस्कृतिचे मुख्य घटक असतात आज त्या-त्या समाज घटकातील तरूणांनी समाजाचे ऐतिहासिक संशोधन करून पुढील पिढीला मार्गदर्शन करावे ही अपेक्षा कांदबरीतून व्यक्त केलेली दिसते. या अनुषंगाने कादंबरीतील सांस्कृतिक अभ्यास पुढीलप्रमाणे अभ्यासणार –

**ग्राम संस्कृती**

प्रा. माधव सरकुंडे यांनी 'वाडा' ही कादंबरी आंध जमातीच्या जीवनावर भाष्य करणारी आहे. आंध आदिवासी समाज जंगलामध्ये राहतात त्यांच्या वाट्याला आलेल्या अनेक व्यथा-वेदना, दु:खासह जगतो. त्यांचे शोषण मोठमोठ्या वाड्यात राहणाऱ्या जमिनदाराकडून होते. आंधांचे वास्तव्य असलेल्या आंधवाडीतही ग्यानवा पाटील नावाचा जमीनदार आहे. त्याची जवळपासच्या वीस वाड्यापाड्यांवर वचक आहे. तो मालकी रूबाबात राहतो. तो आडल्यानडल्या माणसांना कर्ज वाटप करणारा सावकार आहे. अज्ञानी असलेल्या आंधांचे अंगठे घेऊन आवाच्यासवा व्याज लावतो, त्यांच्या जमिनी हडप करतो, त्यांना कायम दास्यत्वात ठेवू पाहतो. अनेक बायकांना त्याच्या वासंधतेचे शिकार व्हावे लागते. हे अन्याय पारंपारिक पद्धतीने आंधांच्या समोर घडत आलेले आहेत तरी ते विरोध करत नाहीत. कारण ते माणसं हतबल आहेत. आंधवाडीमध्ये बैलजोडीच्या पटाच्या शर्यतीत कधी नाही ते पाखऱ्या अंधाची जोडी पाटलाच्या बैलजोडीवर बाजी मारतो. त्या आनंदात त्याच्या दारात रात्रीला दंडारणाचा कार्यक्रम होतो. याचा पाटलाला राग येतो. तो दुसऱ्या दिवशी पाखऱ्याच्या घरी येऊन कोणतेही कारण नसतांना शिव्या देतो. पाखऱ्या खालीमान घालून ऐकत असला तरी त्याची बायको मात्र तोंडाला तोंड देते. हे पाटलाला खपत नाही. तिच्यावर आपल वजन ठेवण्यासाठी पाखऱ्याला म्हणतो, पाखऱ्या! तुह्या रांडकुडीला आवर! नायी तिच्या गांडीत चटणीभरून तिला ठेचीन[१] त्यावरून आंध म्हणजे पाटलाचे गुलामच असल्यासारखी वागणूक तो कायम ठेवू पाहतो. गावातील लोक नदी, नाल्यावर एकजुटीने मासोळ्या, खेकडे पकडायला जात असतांना एकदा यादव भीकऱ्या हा गायब होती तर पाटील पोलीसांना बोलावून शाम्या, गोध्या, पांड्याला झोडपू झोडपून यादव यांच्या खुनाचा आरोप तीघांवर टाकतो.

पोलीस देखील काहीच चौकशी न करता त्यांना जेलमध्ये टाकतो. ‘पाटील बोले न् दल हाले’[२] आशी गत व्हती आंधवाडीला.

आंधवाडीतील लोक सर्व एकत्र मिळून शिकार करायचे पंचमी झाल्यावर पंधरा दिवसाची झड लागली की लोकांना कामधंदे नसायचे तेव्हा ते हरणाची, रोह्याची शिकार करायला जायचे. पाटलालाही शिकारीचा शोक होता. तोही शिकारीला जायचा अन आंध शिकार करायचे ते पोटासाठी. आंध आदिवासी असल्याने शिकार करणे हा त्याचा जन्मजात धंदा होता. सर्व गावकारी सोबत कष्ट करायची तसेच गावकरी श्रद्धाळू असल्याचेही दिसून येते. आजारपणात दावलमलकाच्या नवस केला त्याला बोकुळ वाहाचा त्या बोकळावर पाटलाचा डोळा असतो. परंतु तुक्यानं बोकुळ द्याला नकारतो. परंतु पाटील दोन आडदांड मानसं पाठवून तुक्याचा बोकुळ पळवून नेला. वाड्यात कापून सिजून खाल्ला. नवसाचा बोकुळ पाटलान नेला म्हणून तुक्याला लय खराब वाटते. त्याची झोप उडते. त्याला भीती वाटते की दावलमलीक आपलं कायी ना कायी करणार. कुणी तरी बेमार पडणार, असा इचार त्याच्या मनात येतो. दुसऱ्या दिवशी ते दोघेही देवाच्या दर्शनाला जातात व देवाची क्षमा मागतात. नवस फेडणारच असे कबुल करतात. ‘अन्याय पोटात घे देवा’[३] अशा प्रकारची भाबळी श्रद्धा आपल्याला दिसून येते.

पंचीमी जावून पोळा आला पीक मस्त व्हते. सर्व रान हिरवेगार दिसून येते. मेंडसीगचे ढवळ फुल वावरच्या बांधावर दिसते. पाण्याचे पाट जागोजाग वाहत दिसते. उडदं-मुंग, चखोट शेंगावर आलेले दिसते. हरणाचे थवेच्या थवे शेतात दिसतात. शेतात गायीचे खांड चरायचे सगडीकडे हिरवेगार रान. वाऱ्याची झुळुक थंडीगार आभाळात ढगांची धावपळ हे सगळ पाहिल की जगात किती आनंद आहे अस आंध लोकांना वाटायचे. आंध लोक आनंदही एकत्र साजरा करत असे. सित्या आंधाला दहा मनाच्यावर ज्वारी झाली होती. ज्वारीचे पीक पाहून सित्याला फार आनंद झाला त्याला वाटायचे की आपल्याला ‘वाघामायीच्या आसीम वादांना इतकी जेवारी झाली’[४] त्यासाठीपण नवस बोलला गेला होता. नवस आटपूनच ज्वारी भरावी असे त्याला वाटले. नवस फेडण्याकरिता सर्व गावकऱ्यांना जेवणाचे आंमत्रण दिल्या जाते. त्याचे वर्णन कादंबरीतून आपल्याला दिसून येते. आंध समाजातील लोक आनंदात

मासाहार आणि मद्यपान करतांना आढळून येते. सर्वलोक एकत्र कुटुंबासारखे आनंद साजरा करतांना दिसून येते.

## सण-उत्सव संस्कृती

आंध आदिवासी जमातीमध्ये परंपरागत चालत आलेल्या सण उत्सवाबरोबरच, आनंदाच्यावेळी सादर केल्या जाणाऱ्या आंधाच्या दंडार या लोककलेचे सादरीकरण आंधवाडीमध्ये होते. त्यांची जमातपंचायत व पंचाने शिक्षा म्हणून आरोपीने बोकडाचे जेवण देण्याची प्रथा याचा प्रत्यय कादंबरीतून येतो. आंध जमातीचे अल्पभूधारकत्व, दुसऱ्याच्या शेतात जाऊन उदरनिर्वाह करण्याची परंपराही लेखक कादंबरीतून उजागर करतो. आंधवाडील लोक वाघामाय, मेस्कामाय, पोखामाय, खोकलामाय, जरीमाय, मरीमाय, मुंज्या इत्यादी देवदेवता येतात. तर त्यानुषंगाने सण, उत्सव, विधी, पूजांचे संदर्भही स्पष्ट होतात. लग्नविधीप्रसंगीचे परंपरागत विधी निसर्गाच्या अधिक जवळ जाणारे व त्यांच्या जगण्याशी पूरक असलेले दिसतात. बाज्याच्या लग्नाचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केलेले आहे. मांडव घालण्यापासून ते लगन लागोस्तोर इचलवाडीच्या लोकायनं बाज्याला आंतर पडू देलं नायी. येकच आक्षीताचं काम सोडलं तं मांडवाचे जाळे आनं, जांभुळनीचे ढाळे तोडनं. दरात टाकायला मासोळ्या धरनं. असे सर्वे कामं लोकच करत व्हते.[५] आंधाच्या लग्नातील दराचे पूजन, हिरवा मांडव, जंगलातून जाळे तोडून आणणे, बकरे कापणे, घारेव रे घारेव इरकारेव इत्यादींचे संदर्भ वाडा कादंबरीतून उजागर होतात. आंधांमध्ये रूढ असलेल्या अनेक विधींपैकी लग्नविधी सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट करणारी आहे. वाडा कादंबरीतून आलेले शिकारीचे संदर्भही आंधाच्या सांस्कृतिक जीवनाचाच एक भाग असलेले दिसतात. कारण त्यांच्या लोककलेतून ते उजागर होतात. लेखकाने कादंबरीत लग्नाच्या वरातीचे चित्र दाखवलेले आहे त्यावरूनही अंधांची संस्कृती स्पष्ट होते.

## क्रीडा संस्कृती

आंधांना परंपरागत शिकारीची आवड असलेली दिसते. या कादंबरीतून अनेक व्यक्तीरेखांच्या कृतीतून जे उजागर होत असलेले दिसते. त्यानुषंगाने नदीवर मासे धरणे, खेकडे पकडणे, ससे, लाव्हरं, चितरं, मोर धरणे इत्यादी कृतीचा तसेच त्यासाठी लागणाऱ्या साधनांमध्ये वाघूर, घुमलं, डापके, फासे,

इसोर इत्यादींचे संदर्भ येतात. आंधवाडीला लोक वाघामाय, मेस्कामाय, पोचामाय, खोकलामाय, जरीमाय, मरीमाय, मुंज्या इत्यादी देवदेवतांना श्रद्धापूर्ण भावनेने पूजतात. त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठी नवस बोलून ते पूर्णही करतात. नवसाला कोंबडा, बकरा कापणे, त्याच्या गरम रक्तात ज्वारीच्या कण्या भिजवून मरीमायला नैवेद्य ठेवतात. पाऊसाने उघडीप दिल्यामुळे पिके वाळून जातात. तेव्हा हे आंधवाडीतील लोक निसर्गाला आवडतात. त्याचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केलेले आहे. पाणी येवावं म्हणू आंधवाडीतील पोर पोरायनं 'धोंडी धोंडी पाणी दे' मनू मनू च्युकत्या देवायला पाणी घातलं. सदरीच्या घरून शेरपसा माघून आणून देवायपसी कण्याची पंगत केली.[६] ही वर्तमान काळात अंधश्रद्धा असली तरी आंध मोठ्या श्रद्धेने हा विधी पार पाडतात. जादूटोण्याचा संदर्भ उजागर करण्यासाठी लेखकाने खंड्या वईद व तान्ह्या वईद या दोन व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. ते करणी करणे, भानामती करणे, मूठ मारणे, पाणी भारून देणे, अंगारा धुपारा यासारखे अनेक प्रकार करतात. मसनवट्यातून ते मृत स्त्रीचा मृतदेह काढतात. जादुटोण्याचा त्रास आंधवाडीला होत आहे असा आरोप खंड्या वईदावर ठेवून जमातपंचायत त्याला वाळीत टाकते. त्याची जादू नष्ट व्हावी यासाठी बायाचा विटाळ, गू व चांभाराच्या कुंडातील पाणी एकत्र करून जबरदस्तीने पाजले जाते..

**कृषी संस्कृती**

वर्तमान काळात डोंगरदऱ्यात, जंगलातील वाड्यापाड्यामध्ये वास्तव्यास असलेल्या आंधांच्या जगण्यात कादंबरीचे अनेक संदर्भ टिकून असलेले दिसतात. वाडा या कादंबरीतील स्त्रिपुरूषांच्या तोंडची बोली ही आजही आंध लोकांची बोली असल्याचे सहज जाणवते. आज संविधानामुळे पाटलांच्या वाड्याचे बुरूज ढासाळलेले आहेत. ही गोष्ट खरी असली तरी आंधांकडे उदरनिर्वाहाचे अपूरे साधने असल्यामुळे त्यांना बाहेरगावी व दुसऱ्याच्या शेतात कामासाठी जावे लागते. त्यामध्ये हळद काढणे, ऊस तोडणे, कापूस वेचणे, हायब्रिड, गव्हू इत्यादी पिके काढण्यासाठी गेल्यावर त्यांना अपमानदर्शक वागणूक मिळतच असते ही वास्तवता आपण नाकारू शकत नाही.

शिक्षणामुळे आंधांमधील लोक नोकरीच्या प्रवाहात येत आहेत ही गोष्ट खरी असली तरी त्यांची संख्या मुठभर असलेली दिसते. डोंगरदऱ्यात राहणारा आंध आदिवासी आजही मुख्यप्रवाहापासून दूरच

आहे. आज बिरसामुंडाची चळवळ आंधांमध्ये जोर धरू लागली आहे. त्यांना संविधानाने दिलेल्या हक्काच्या अनुषंगाने व बाज्याच्या विचारधारेने पेटवून समानधारेत आणणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी आंध जमातीला व त्यानुषंगाने समग्र आदिवासी समूहाला 'वाडा' कादंबरीने एक प्रकारे वैचारिक बळच दिलेले आहे.

**निष्कर्ष**

१) 'वाडा' या कादंबरीतून आंध आदिवासी जमातीचे जगणे वास्तव रूपाने दिसून येते.

२) आंध आदिवासी जमातीमध्ये आगळ्यावेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडते.

३) आंध आदिवासी जमातीमध्ये मासाहार, मध्यपान आणि नृत्य हे सांस्कृतीचा भाग आहे हे दिसून येते.

४) अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी वैचारिक बळही कादंबरीतून आलेले दिसते.

५) आंधांच्या अज्ञानाचा अन्यायाचा अत्याचाराचे वास्तवता मुखर होते.

६) आंधांचे निसर्गविलंबन, स्वाभिमानीवृत्ती, प्रामाणिकपणा व काटकपणा वाडा कादंबरीतून प्रकट होतो.

**संदर्भ ग्रंथ:**


१) डॉ. संजय लोटकटे व रामदास गिळंदे, "विद्यापीठ अभ्यासक्रमातील आदिवासी साहित्य", मेघा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, २०१८.

२) तुकाराम विनायक, "आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन", स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

३) माधव सरकुंडे, "वाडा", देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १९९६.